# ऑफ बीट करिअर ?????

"संकेत एम सी एम झाला  आहे. दिसायला पण छान आहे. तबला विशारद आहे. त्यानं तबला हेच रोजी रोटीच

क्षेत्र निवडल. दर महिना सरासरी ५० ते ६० हजार मिळवतो. शिवाय अनेक दिग्गजांना साथ करतो तबल्याची. शिवाय सोलो वादनाचे कार्यक्रम सुद्धा होतात त्याचे. असा  सुंदर हात आहे नं त्याचा  तबल्यावर ! पण..... हल्ली मुलींना नोकरीवालाच पाहिजे नं.  नकारच येतात त्याला. त्याच्या लग्नाची काळजी वाटते मला. आणि त्याने जमवले नाही स्वतःचे म्हणजे आता आम्हालाच कंबर कसायला हवी." स्मिताताई काळजीत पडल्या होत्या. ती चिंता, काळजी त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती.

त्यांना म्हटले संकेत येईल का मला भेटायला , एखद्या दिवशी गप्पा मारायला? त्या म्हणाल्या " हो येईल की. मी सांगेन त्याला. "त्या दिवशी संकेत आला  होता मला भेटायला. छान उंचापुरा संकेत गप्पीष्ट होता. त्याच्या क्षेत्रातल्या गंमती जंमती सांगत होता. . गेली ३/४ वर्ष भारताबाहेरच्या देशात त्याचे कार्यक्रम होत होते. मी त्याला सहज विचारलं "अरे परदेशातले कार्यक्रम तर वीक एंड लाच होत असतील न? मग सोमवार ते शुक्रवार तू काय करतोस ? साईट सीइंग तर यापूर्वीच झालेलं असेल, मग आता काय करतोस? कंटाळा येत असेल न? "

---

तो म्हणाला," हो खूपच कंटाळा येतो. कारण आम्ही ज्यांच्या कडे राहतो ती माणसे कामाला जातात. आपण एकटेच असतो. पण त्यामुळे मी काय करतो तर मी तिकडे जाण्यापूर्वी ५० तबल्याच्या जोड्या पाठवतो आणि मग सोमवार ते शुक्रवार माझा तबला विकण्याचा उद्योग चालतो."  मला एकदम मस्त वाटलं. असं वाटलं कि अरे हा मुलगा स्वस्थ बसणारा नाही. उद्योगी आहे. काहीना काहीतरी करत राहणारा आहे. शिवाय त्याच्याशी बोलताना लक्षात आल कि त्याला कोणत्याही प्रकारच व्यसन नाही.

नंतर एक दिवस अश्विनी आणि तिची आई मला भेटायला आल्या असताना मी सहज संकेतचे स्थळ सुचविले. अपेक्षेप्रमाणे त्या दोघींनीही नाक मुरडलं. कारण विचारलं असतं अश्विनी ची आई म्हणाली," लोक आम्हाला विचारतील कि काय करतो तुमचा जावई? तर काय सांगू, तबला वाजवतो म्हणून? छे कसतरीच वाटतं."

अश्विनी ला मी म्हटलं," अग तुला निर्व्यसनी मुलगा हवा  होता  न ? संकेत या क्षेत्रात असूनही निर्व्यसनी आहे. शिवाय त्याच्या अंगात गट्स आहेत. तो उद्योगी आहे.तसच त्याचं इन्कम पण चांगला आहे.

बघ विचार कर. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी नेमकं काय हवं आहे त्याचं विचार कर."

अश्विनी विचारात पडली.

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------

आसावरी जात्याच हुशार. एम कॉम झाल्यानंतर कॉम्पुटर चे विविध कोर्सेस करून एका मोठं नावाजलेल्या बँकेत काम करीत होती. शिक्षण चालू असताना पुण्यातल्या एका नावाजलेल्या संस्थेतून तिने ५ वर्षाचा कीर्तनाचा कोर्स पूर्ण केला आणि नंतर तिला असं वाटू लागल कि बँकेची नोकरी सोडून कीर्तनातच करिअर करावं. त्याप्रमाणे तिनं स्वतःचा कीर्तनात चांगला जम बसवला. हार्मोनियम वाजवण्यात तिला आधीपासूनच रस होता . त्याचाही तिला उपयोग झाला. पण कीर्तन करणाऱ्या आसावरी चे  लग्न मात्र ठरत नव्हते. नेहमीपेक्षा वेगळी करिअर होती ना तिची ?

सुरज नावाचा एक मुलगा मला भेटायला आला होता. संगीताची आवड होती त्याला.  त्याला मी आसावरीचे स्थळ सुचविले. तो क्षणार्धात म्हणाला," नको नको कीर्तन करणारी मुलगी नको."

म्हटल," अरे का पण ? "

तर म्हणाला," नको नेहमीसारखी नोकरी करणारी असावी. "

मी त्याला म्हटल," अरे कीर्तन करणाऱ्या व्यक्तीकडे भरपूर गुण असावे लागतात,. ती व्यक्ती बहुश्रुत असायला हवी, तिचं वाचन चांगल पाहिजे, संतसाहित्याचा अभ्यास हवा , आणि त्याचबरोबर नवीन जगाच ज्ञानही हवं . शिवाय संगीताचं ज्ञान पाहिजे, हजरजबाबीपणा पाहिजे, श्रोत्यांना बरोबर घेऊन जाता आल पाहिजे, अभिनयाचं अंग असायला हवं, आणि ते एक सामाजिक कामही आहे. प्रबोधनाच , जन जागृतीचं काम कीर्तनाद्वारे करता येतं. अशा व्यक्तीला तू काहीच विचार न करता नाही का म्हणतो आहेस?"

सुरज आश्चर्य चकित झाला होता. तो म्हणाला, " बापरे, हा एव्हढा विचार मी केलाच नव्हता. खरच इतकं सगळं माझ्या मनात आलंच नाही. मी नक्की या स्थळाचा विचार करेन "

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

एखद्या मुलाचे/ मुलीचे वडील शेती करणारे असतील तर त्यांच्या मुला- मुलींची लग्ने जमण्यात अडचणी येत आहेत. मग स्वतः मुलगा शेती करणारा असेल तर पाहायलाच नको. निरजाचे वडील शेती करणारे. नीरजा एका मोठ्या आय टी कंपनी मध्ये बंगळूरू ला काम करते. निरजाचे वडील पुण्याजवळच्या – साधारणपणे ३५/४० किलोमीटर वर असलेल्या गावात शेती करतात. त्यांच्या शेतात त्यांनी केलेल्या संशोधनामुळे भरघोस कांदा उत्पादन आले होते, त्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केला होता. निरजाचे वडील वेगवेगळे प्रयोग करणारे होते.

" पण मुलीचे वडील काय करतात, असा प्रश्न आल्यावर जर त्याचे उत्तर शेती असे आले तर मुलांचे पालक फोन ठेऊनच देतात. "—निरजाचे बाबा हताश झाले होते. ते म्हणाले इतके दिवस माझ्या कामाचा, शेतीतल्या प्रयोगांचा मला स्वतःला अभिमान वाटत होता , पण आज.......... माझ्या मुलीच्या लग्नात माझ्या कामाचा अडथळा येईल असे मला कधीही वाटले नव्हते. वाईट इतकेच वाटते कि अशा असंवेदनशील समाजात वावरावे लागते."

नेहमीच्या चाकोरी पेक्षा वेगळे ऑफ बीट करिअर असेल तर खरोखरंच लग्न जमण्यात अडचणी येत आहेत. असा आमचा अनेक वर्षांचा अनुभव सांगतो. जरा कुठे चौकटी बाहेरचे काम करणारा मुलगा किंवा अगदी मुलगी जरी असेल तरी त्याचे /तिचे लग्न जमणे लांबणीवर पडते. लोकं कोणता ही वेगळा विचारच करत नाहीत असं लक्षात येतं. त्याच त्याच चौकटी तून फिरायला लोकांना आवडतं. अशा वेळी प्राधान्यक्रम विसरायला होतात. मला लग्नापासून काय हवंय हे मागे पडते. अनेकदा लोकं काय म्हणतील ह्याचे प्रेशरही असते.

लग्नाच्या संदर्भात कमालीची असुरक्षितता अनेकांच्या मनात लपलेली आहे. प्रतिष्ठेच्या संकल्पना बदलल्या आहेत.

केटरिंगचा व्यवसाय करणारी मुले/ मुली, तसेच कॉर्पोरेट क्षेत्रात छोट्या फिल्म्स बनवणारी मुले, इतकेच नाही देशासाठी आर्मी / नेव्ही मध्ये असणारी मुले/ मुली, एअरफोर्स मध्ये असणारे, पौरोहित्य करणारे, कमर्शिअल artist, जी दि आर्ट्स , आहारतज्ञ, भूगर्भशास्त्र , संशोधन, नृत्य, संगीत, दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांमध्ये काम करणारे, अशा अनेक क्षेत्रातल्या मुले- मुलींची लग्ने जमणे अवघड होत आहे.

हा प्रश्न पैशाच्या भोवती फिरणारा म्हणावा तर अशा क्षेत्रातल्या अनेकांना पैसा बर्यापैकी मिळतो. एक कुटुंब चांगल्या पद्धतीने चालवता येईल इतका पैसा तर मिळू शकतो.. पण कोणताही धोका पत्करण्याची अनेकांची मानसिक तयारी नाही. पर्यायाने या मुला मुलींची वये वाढत जातात. आणि त्यांना वेगळ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते. एकटेपणाला त्यांना तोंड द्यावे लागते. स्वभावामध्ये कटुता येत जाते. मित्र मैत्रिणींपासून ते दूर जातात. घरातल्या लोकांना सुद्धा आपल्या मुलांचे लग्न झालेले नाही याचे वैषम्य वाटते.

नंदा वय ३३-- तिचा स्वतःचा उकडीचे मोदक करण्याचा व्यवसाय. रोज सुमारे ८०० ते ९०० मोदक ती करत असे. तिच्या हाताखाली चार/ पाच बायका होत्या. आली होती भेटायला. बोलता बोलता म्हणाली," होईल न माझं लग्न? घरात भाऊ वाहिनी आणि त्यांची दोन मुले. वडील लहानपणीच वारलेले आणि गेल्या वर्षी आई गेली, माझ्या व्यवसायाचा किती नाही म्हटलं तरी पसारा होतोच. घरात उपरं वाटतं. कधी एकदा या घरातून जातेय असं वाटतं ........."

असे अनेक अनुभव. ............ ऑफ बीट करिअर असणाऱ्यांच्या बाबतीत आपण सगळ्यांनीच मानसिकता बदलायला हवी. हो ना ?